## मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित

मुख्य कार्यालय ''मुंबै बँक भवन''२०७,डॉ.डी.एन.रोड,फोर्ट,मुंबई- ४०० ००१.
मुख्यालय फोन नं. ०२२ - २२६१७१५४ ते ५९
Email - contact -recovery@mumbaidistrictbank.com

## स्थावर मिळकत जाहीर लिलाव विक्री

**(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ ला अधिन राहून )**

**लोकमिलन को-ऑप. क्रेडिट सोसायटी चे माजी अध्यक्ष श्री.भारत मच्छिंद्र तोरणे (श्री.मच्छिंद्र तातू तोरणे यांचे वाली वारस) यांनी घेतलेल्या सुरक्षित कर्ज व व्याज इतर खर्च इत्यादी खर्च वसुलीसाठी (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये विशेष वसुली व विक्री अधिकारी मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित ''मुंबई बँक भवन'',** २०७, डॉ.डी.एन.रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१. यांनी ताब्यात घेतलेली स्थावर मालमत्ता खालील स्वाक्षरीकर्ते **"जशी आहे आणि जेथे आहे" या तत्वावर खरेदीसाठी मोहरबंद देकार मागवित आहेत. लिलाव विक्रीच्या मालमत्तेचा तपशिल खालील प्रमाणे.**

| कर्जदार/जामिनदार/ मिळकतदार नाव व पत्ता | मिळकतीचा तपशिल | राखीव किंमत रुपये | इसारा रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| लोकमिलन को-ऑप. क्रेडिट सोसायटी चे माजी अध्यक्ष श्री.भारत मच्छिंद्र तोरणे (श्री.मच्छिंद्र तातू तोरणे यांचे वाली वारस) रा. चोपडी, ता.सांगोला जि. सोलापूर | रा. चोपडी, ता.सांगोला जि. सोलापूर येथील गट क्र.२३६, क्षेत्र १.०७ हे.आर | रु.३६,३८,०००/- | रु.१०,००,०००/- अक्षरी रु. दहा लाख फक्त |

## अटी व शर्ती

**उपरोक्त मालमत्ता वरील निर्देशित राखीव मुल्यांपेक्षा कमी किमतीत विकली जाणार नाही.**
**विक्रींची अटींची व शर्तींची पूर्तता न करणारे प्रस्ताव रद्द करण्यात येतील**

१. कर्जदार, जामिनदार व मिळकतदार यांनी सदर लिलावाचे वेळी स्वत: उपस्थित रहावे. अनुपस्थित राहिल्यास त्यांच्या गैरहजेरीत लिलावाची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी कर्जदार, जामिनदार व मिळकतदार यांची राहिल.

२ इच्छुक खरेदीदारांना लिलाव विक्री मिळकतीची पाहणी मालमत्तेचे वर्णन केलेल्या ठिकाणी दि.१४/११/२०२२ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत करता येईल.

३ **मिळकतीचा जाहीर लिलाव :-**

**लिलावाचे ठिकाण** :- तलाठी कार्यालय, रा. चोपडी, ता.सांगोला जि. सोलापूर

**लिलावाचा दिनांक** :- दि.३०/११/२०२२

**लिलावाची वेळ** :- सकाळी ११.०० वाजता

Special Recovery & Sales Officer Section 156 (1) (2) of M. C. S. Act.- 1960 Rule 2 (1) (J), Rule, 107 of M. C. S. Rules, 1961 ( Co-op. Dept.) Mumbai District Central Co-op. Bank Ltd.

Scanned with CamScanner

४. लिलाव विक्री मालमत्तेसंबंधी माहिती मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित मुख्य कार्यालय, कर्ज वसुली विभाग ''मुंबई बँक भवन'', २०७, डॉ.डी.एन.रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१. फोन क्रमांक : ०२२ - २२६१७१५४ ते ५९ वर मिळेल.

५. देकारासोबत सदरची इसारा रक्कम कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेच्या मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित यांचे नांवे काढलेल्या डिमांड ड्राफ्ट स्वरुपात (अयशस्वी बोलीदारांना इसारा रक्कम विनाव्याज परतावा करण्यात येईल) असावा.

६. देकार उपरोक्त इसारा ठेवीसहचे (इरठे) मोहोरबंद लिफाफ्यातून त्यावर लोकमिलन को-ऑप. क्रेडिट सोसायटी चे माजी अध्यक्ष श्री.भारत मच्छिंद्र तोरणे (श्री.मच्छिंद्र तातू तोरणे यांचे वाली वारस) यांच्या लिलाव विक्रीच्या मालमत्ता खरेदीसाठी देकार असे नामोर्लेख करुन ते मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, येथील उपरोक्त नमूद केंद्र कार्यालयात दि.२५/११/२०२२ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी पोहच करावे.

७. ज्या खरेदीदाराने लिलावात सर्वात जास्त रकमेची बोली बँकेला देऊ केली असेल अशाच व्यक्तीला / कंपनीला मालमत्तेची विक्री करण्यात येईल.

८. यशस्वी बोलीदाराने सादर केलेली इरठेची रक्कम विक्री किंमतीत समयोजीत करण्यात येईल.

९. खालील स्वाक्षरीकर्त्याकडे पोहोचलेले देकार विचार घेण्यात येतील आणि ते तलाठी कार्यालय, रा. चोपडी, ता.सांगोला जि. सोलापूर येथे दि.३०/११/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता देकार उघडणेत येतील. विक्री झाल्याच्या खात्रीनंतर यशस्वी देकारास २५ टक्के रक्कम त्वरीत त्याचदिवशी भरावी लागेल. आणि उर्वरीत रक्कम विशेष वसुली व विक्री अधिकाऱ्यांनी विक्री कायम केलेपासून ३० दिवसाचे आत भरावी लागेल, अन्यथा कुठलीही पूर्व सूचना न देता, देकारदाराने आधी भरलेली संपूर्ण रक्कम बँक जप्त करेल व मालमत्तेची पुन: विक्री केली जाईल व कसूरदार खरेदीदारास कोणताही दावा करता येणार नाही. विक्री कायम झाल्यापासून ३० दिवसानंतरच्या मुदतवाढीचा कालावधी तसेच अशा मुदतवाढीच्या अटी व नियम ठरविण्याचे अधिकार बँक/विशेष वसुली व विक्री अधिकारी राखून ठेवत आहे. वर दिलेल्या मालत्तेवरील हस्तांतरण शुल्क, वीज, पाणी देयक, देखरेख शुल्क, हस्तांतरण खर्च, स्टॅम्प ड्युटी, वैधानिक देयता, कर इत्यादीसह कुठलीही वैधानिक देयता व इतर देय रक्कमांचा खर्च निश्चिती करावी लागेल. व तो खर्च इच्छुक खरेदीदारास करावा लागेल. उच्चतम देकार किंवा अन्य एखादा किंवा सर्व देकार स्वीकारण्यास विशेष वसुली व विक्री अधिकारी बांधील नसतील आणि कोणतेही कारण न देता कुठलेही एक वा सर्व देकार स्वीकारणे किंवा नाकारण्याचे आपले अधिकार बँक / विशेष वसुली व विक्री अधिकारी राखून ठेवत आहेत. जर सर्व देकार नाकारल्यास विशेष वसुली व विक्री अधिकारी मालमत्ता विक्रीसाठी एखादा निविदादार अथवा इतर पार्टीबरोबर खाजगी कराराबाबत चर्चा करु शकतो. लिलाव करण्यात येणाऱ्या मालमत्ता संपत्तीवरील कुणाही अधिकारीणीची कुठलीही देयके वा संरक्षीत मालमत्तेतील कुठलीही त्रुटी वगळणे /फरक / तफावत/ कमी भरणे व कसलीही परवानगी घेण इ. कशाचीही जबाबदारी बँक/विशेष वसुली व विक्री अधिकाऱ्यांची रहाणार नाही. विशेष वसुली व विक्री अधिकारी त्यांच्या मतानुसार लिलावाच्या अटी बदलू / सुधारु / रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवत आहेत.

१०. महाराष्ट्र सहकारी संस्था, नियम १९६१ चे नियम १०७ चे तरतुदीस अधिन राहून लिलाव करणेत येईल.

Special Recovery & Sales Officer Section 156 (1) (2) of M. C. S. Act - 1960 Rule 2 (H) (J), Rule 107 of M. C. S. Rules 1961 (Co-op. Dept.) Mumbai District Central Co-Op. Bank Ltd.

Scanned with CamScanner

११. कोणतेही कारण न देता विक्री जारी करण्यापूर्वी कोणत्याही वेळी विक्री रद्द करण्याचे अधिकार विशेष वसुली व विक्री अधिकारी राखून ठेवत आहेत. अशा प्रकरणी यशस्वी बोलीदाराने भरलेली सर्व रक्कम विनाव्याज परत देण्यात येईल.

१२. विशेष वसुली व विक्री अधिकारी ज्ञात माहितीनुसार स्थित मालमत्तेवर कोणत्याही प्रकारचे भार नाही.

१३. वरील प्रमाणे दिलेला मालमत्तेचा तपशिल बरोबर आहे, परंतु संबंधीत तपशिलाबाबत खात्री करुन घेण्याची जबाबदारी मालमत्ता खरेदीदाराची राहील. त्यास विशेष वसुली व विक्री अधिकारी अथवा बँक जबाबदार असणार नाही.

१४. खरेदीदाराने आपले देकार दिलेल्या वेळेआधी व तारेखआधी सादर करावेत. त्यानंतर येणारे देकार स्विकारले जाणार नाहीत.

१५. बोलीदाराने / खरेदीदाराने फोटोफ्रुफ, अॅड्रेस फ्रुफ, पॅनकार्ड सोबत आणावे.

१६. यशस्वी खरेदीदाराची विक्रीची निश्चिती झाल्यापासुन मालमत्तेची जबाबदारी खरेदीदाराची राहील. त्यास बँक / विशेष वसुली व विक्री अधिकारी जबाबदार असणार नाहीत.

१७. टेंडर फॉर्म अटी / शर्ती रु.१,०००/- रोख रक्कम भरुन बँकेच्या केंद्र कार्यालयामधून उपलब्ध होईल किंवा www.mdccbank.com या संकेतस्थळावरुन Download करता येईल व टेंडर सादर करतेवेळी फॉर्म - फी रु.१०००/- अदा करावी लागेल.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १०६० चे कलम १५६ व महाराष्ट्र सहकारी नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये वैधानिक ३० दिवसांची विक्री सूचना.

कर्जदार / जामिनदार यांना सूचना देणेत येते की, वरील निर्देशित रक्कम व्याज, मुल्य, खर्च इत्यादीसह लिलाव तारखेपूर्वी प्रदानित करावी. अन्यथा जंगम व स्थावर मालमत्तेचा लिलाव करण्यात येईल आणि उर्वरीत रक्कम व्याज आणि मुद्दलासह, कायदेशीर मार्गाने वसूल करण्यात येईल.

**नोटीस :-** वरील वर्णनाच्या मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, भार असल्यास संबंधितांनी या व्यवहारास आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह जाहिर लिलाव नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली सही करणार, विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचेकडे पाठवावी अथवा प्रत्यक्ष सादर करावी.

ठिकाण : फोर्ट, मुंबई
दिनांक : ०१/११/२०२२

Special Recovery & Sales Officer
Section 156 (1) (2) of M. C. S. Act - 1960 Rule 2 (H) (a), Rule 107 of M. C. S. Rules, 1961 (Co-op. Dept.)
Mumbai District Central Co-op. Bank Ltd.

बी. एन. गायकवाड
विशेष वसुली व विक्री अधिकारी
मुंबई जिल्हा मध्य.सह.बँक मर्या.

**B. N. GAIKWAD**
Special Recovery & Sales Officer
Co-op. Societies, Maharashtra State

Y:\Mahesh G\nsg1395.doc

Scanned with CamScanner

# टेंडर फॉर्म

श्री.श्रीमती/मे.------------------------------

पत्ता -------------------------------------

-------------------------------------

-------------------------------------

भ्रमणध्वनी क्र.----------------------------

दिनांक :   /   /

प्रति,
विशेष वसुली व विक्री अधिकारी
मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित
कर्ज वसुली विभाग, १ ला मजला,
मुंबई बँक भवन, २०७, डॉ.डी.एन.रोड,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

**विषय :- टेंडर ऑफर मालमत्ता** रा. चोपडी, ता.सांगोला जि. सोलापूर येथील गट क्र.२३६, क्षेत्र १.०७ हे.आर **बाबत.**

दिनांक ------------- च्या ----------------- वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध केलेल्या जाहिराती नुसार मी श्री.श्रीमती/मे.------------------------------------------------- राहणार ----------------- ----------------------------------------------------------------------------------------- --------------- बँकेने विक्रीस काढलेली मालमत्ता खरेदी करण्याची माझी इच्छा असून त्या संदर्भात ज्या अटी / शर्ती नमूद केलेल्या आहेत त्यास माझी संमती असून मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी जो निर्णय देतील तो निर्णय माझ्यावर कायदेशीररित्या बंधनकारक राहील.

त्यानुसार मी श्री./श्रीमती/मे.------------------------ राहणार---------------------------- ----------------------------------------------------------------------------------------- ------------------- सदर मालमत्ता खरेदी करणे करीता रक्कम रुपये ------------------------ ची ऑफर देत असून त्यापोटी इसारा रक्कम रु.२,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख मात्र) रक्कमेचा - --------------------------------------------- राष्ट्रीयकृत बँकेवर काढलेला डिमांड ड्राफ्ट दिनांक   /   /२०२२ क्रमांक -------------------------------- सोबत जोडत आहे.

( श्री./श्रीमती/मे.---------------------------- )



Scanned with CamScanner